FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

पहिली खबर

0154171

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ए.सी.बी. पहिली खबर क्र. FIR No. ९२, वर्ष Year २०२२ दिनांक Date २०/०३/२०२२

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र.अधि १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ......, कलमे Sections ......
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day सोमवार तारीख पासून Date from ०८/३/२२ वेळ Time ११:००, तारीख पर्यंत Date to ०९/३/२२, वेळ Time १८.०० वा.

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date ०८/०३/२०२२ वेळ Time ११.०० वा

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०२/२०२२ तारीख Date २०/३/२२ वेळ Time ०५:४५ वा

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ......

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ......, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. अंबुजवाडी बिट क्र.०५
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव ......, ठिकाणाचे नंबर ......, गल्ली ......, रस्त्याचे नाव ......
   Address of Occurrence Name No. if any Ward Name of road कारगील रोड, आझाद नगर गेट नं. ८ मालाड (प)

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ......, गाव ......, पोस्ट ......, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
   Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव मालवणी पो. ठाणे तालुका मुंबई जिल्हा मुंबई राज्य ......
   In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name मोहम्मद तहसीन सादिक अन्सारी (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name मोहम्मद सादिक अन्सारी

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ३१ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality ...... फोन नं. Phone No. 9619615828

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ......, दिल्याचा दिनांक Date of Issue ...... दिल्याचे ठिकाण Place of Issue ...... (f) व्यवसाय Occupation गोवंडी काम

   (g) धर्म Religion मुस्लीम, जात Caste अन्सारी, जनजात Sub-Caste अन्सारी

   (h) पत्ता Address : ......, गल्ली / सर्व्हे नं. Ward ...... घर / नाव नं. House/Name No. ...... फोन / मो. नं. Phone/Mo. No. ...... पॅन नं. PAN No. AZAPA4585B वोटर्स नं. Card No. NLF4131769

   रस्त्याचे नाव Road ......, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ......, गाव Village ......, पोस्ट Post ......, पो. स्टे. P. Stn. ......

   तालुका Taluka नगीना, जिल्हा Dist. बिजनोर राज्य State उत्तर प्रदेश, सध्याचा पत्ता Present Address सहारा अंबुजवाडी वेलफेअर सोसायटी कारगील रोड विमल मदरसा जवळ मालवणी मालाड (प) मुंबई ९५

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

गणेश गुलाबराव सांळुके, वय ३८ वर्षे पोलीस शिपाई क्र. ०५०२८५/ मालवणी पोलीस ठाणे, मुंबई रा. ठी साईकृपा गोपाळ चाळ जासुपाडा ठाकुर व्हिलेज, कांदिवली (पूर्व) मु. १०१ गावचा पत्ता: मु.पो. वडगाव निंबाळकर वेताळ नगर ता. बारामती जि. पुणे.

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 823

Scanned with CamScanner

यातील फिर्यादी मोहम्मद तेहसीन आदिक अन्सारी वय ६७ वर्षे यांचा स्वंतत्र पानावर संगणकावर टंकलि केलेला जबाब हाच प्रथम खबरी अहवाल म्हणुन संबोधण्यात येत आहे.

मो० तेहसीन

समक्ष

10.3.21

(प्रविण बलगोसावी)
पोलीस निरीक्षक,
भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग,
मुंबई

Scanned with CamScanner

फिर्याद                                                    दिनांक – १०/०३/२०२१.

मी मोहम्मद तेहसीन सादिक अन्सारी, वय ६१ वर्षे, धंदा– गवंडी काम , रा.ठी.स्वत:चे घर, सहारा अंबुजवाडी वेल्फर सोसायटी, कारगिल रोड, बिलाल मदरसा जवळ, मालवणी मालाड (पश्चिम) मुंबई– ४०००९५ मो.क्र. ९६१९६१५८२८.

---------

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझी पत्नी मैसरजहाँ, वय ४० वर्षे, मुले १) उमर, वय २८ वर्षे, २) तज्जर, वय २६ वर्षे, ३) अबुबकर, १८ वर्षे, ४) अबुजर, वय १२ वर्षे यांचे सह गेल्या २२ वर्षापासुन राहतो. मी व माझा मुलगा अबुबकर असे दोघे मिळुन मी रहात असलेल्या व मालवणी परीसरातील लोकांचे घरदुरुस्तीचे काम करतो त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितो.

सुमारे १५ दिवसांपुर्वी मालवणी पोलीस ठाण्याचे पोलीस गणेश साळुंके (बीट ऑर्डली) यांनी माझे घराजवळ येवुन मला बोलावुन सांगितले की, " तुम्ही ८० रुम अनधिकृत बांधल्या आहेत तुमचे व तुमच्या सर्व मुलांचे नांव पोलीस ठाण्यात आले असुन तुम्हाला एम.पी.डी.ए. लावून तुम्हा सर्वांना एका वर्षासाठी जेलमध्ये जावे लागेल व जेलमध्ये जायचे नसल्यास त्याबाबत आम्हाला १० लाख रुपये दयावे लागतील" असे सांगितले.

त्यानंतर २ दिवसांनी पुन्हा पोलीस गणेश साळुंके यांनी मी रहात असलेल्या घरी येवून माझा घराचा दरवाजा ठोठावून मला पैशांबद्दल विचारले, त्यावर मी त्यांना पैसे कमी करण्याबाबत विनंती केली असता, पोलीस गणेश साळुंके यांनी रु. ५ लाख दयावे लागतील असे सांगितले. त्यानंतर दोन दिवसांनी मी माझेवर व माझ्या मुलांवर कारवाई होवू नये या भितीपोटी ३ लाख रुपये पोलीस गणेश साळुंके यास दिले.

त्यानंतर २ दिवसांनी आमच्या परीसरात राहणारे व मालवणी प्लॉट नं.३ येथे ऑफिस असणारे झाकीर डॉट कॉम नावाच्या व्यक्तीने यांनी मला बोलावुन सांगितले की, तु पोलीस गणेश साळुंके यांना देणार असलेल्या पैशांपैकी रु. १ लाख मला दयावे लागतील व कोणी पोलीस स्टेशनचे पोलीस आले तर माझे त्यांचेशी बोलणे करुन दे असे सांगितले व माझे कडुन रु. १ लाख झाकीर याने पोलीसांना दयावयाचे आहेत असे सांगुन घेतले.

उर्वरीत रक्कमेपैकी रु. १ लाख पोलीस गणेश साळुंके यांनी दि. २०/०३/२०२१ रोजी घेवुन येण्यास सांगितले. मला पोलीस गणेश साळुंके (बीट ऑर्डली) यांस लाच देण्याची अजिबात इच्छा नसल्याने मी दि. ०८/०३/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे तक्रार दिली. त्यानंतर पो.नि. बनगोसावी यांनी मला पुढे करण्यात येणाऱ्या कारवाईबाबत थोडक्यात माहिती सांगुन सदरची कारवाई दि. ०९/०३/२०२१ रोजी करण्यात येणार असल्याचे सांगितले..

दि. ०९/०३/२०२१ रोजी सकाळी १०.४५ वाजता पो.नि. बनगोसावी यांनी मला माझे वरील नमुद मोबाईलवर फोन करुन जनकल्याणनगर, चारकोप येथे परस्पर येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी तेथे सकाळी ११.४५ वा पोहचलो थोडयाच वेळात पो.नि. बनगोसावी व पोलीस पथक दोन सरकारी वाहनांमधुन जनकल्याननगर चारकोप, मालाड(पश्चिम), मुंबई येथील भुमी मार्ट या दुकानाजवळ आले त्यावेळी पो.नि. बनगोसावी यांनी पोलीस पथकातील स.पो.आ. आबासाहेब पाटील, व दोन सरकारी पंच व पोलीस पथकाची माझेशी ओळख करुन दिली.

त्यानंतर पो.नि. बनगोसावी यांनी मला सापळा कारवाई करण्यापुर्वी करावयाच्या पडताळणीची माहिती समजावुन सांगितली. व पोलीस गणेश साळुंके यास त्याचे मोबाईलवर फोन करुन ते मालवणी पोलीस स्टेशन परीसरात असल्याची खात्री करुन भेटावयास जायचे ठरले. त्याप्रमाणे पो.नि. बनगोसावी यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी माझे वरील मोबाईल क्रमांकावरुन गणेश साळुंके यांचे मोबाईल क्रमांक ९८६७७९६३८० यावर फोन केला असता त्यांनी तो उचलला नाही. त्यानंतर थोडया वेळात १२.५७ वाजता पोलीस गणेश साळुंके यांचा

Scanned with CamScanner

मला माझ्या वरील मोबाईलवर फोन आला असता, तो मी उचलला व माझे फोनचा स्पिकर ऑन केला. सदरचा कॉल पो.नि. बनगोसावी यांनी त्यांचेकडील डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये रेकॉर्ड केला. त्यावेळी झालेल्या संभाषणा दरम्यान मी गणेश साळुंके यांना भेटावयाचे आहे असे विचारले असता त्यांनी ते आंबेडकर चौकात असल्याचे सांगुन १५ ते २० मिनिटांत माझे घरी येतो असे सांगितले.

त्यानंतर पो.नि. बनगोसावी यांनी मला व पंच क्र.१ पांडुरंग गवळी यांना पडताळणी कारवाई बाबत योग्यत्या सुचना दिल्या व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दु. ०१.०४ वा. चालु करुन माझ्या शर्टाच्या आतील बनियनला लावुन मी व पंच क्र. १ असे पोलीस गणेश साळुंके यांना भेटण्यासाठी माझे वरील नमुद घराच्या दिशेने रिक्षाने निघालो. मी व पंच क्र. १ गवळी असे माझे घरी दुपारी ०१.३० वा. दरम्यान पोहचलो. त्यानंतर थोडयावेळात पोलीस गणेश साळुंके हे माझे घरी आले त्यावेळी मी गणेश साळुंके यांना त्यांनी माझेकडे मागितलेली रक्कम कमी करण्याबाबत बोललो असता ते मला म्हणाले की, “नही नही उसमे कम नही, तुमको बोला भी मै, उस दिन भी बोला था मै, जो है बात है, नही...नही कम क्या करनेका, अरे तुम मेरी बात समझा नही, ८० कुछ नही, अपने पास कमी नही है लोगोंकी, ऐसा है ना, ए नही दुसरे दो सौ आते है । अरे बडे भाई, हकीम भाय मेरी बात सुनो इसमें कम कुछ होयेगा नही । ए जो भाय एक बोला उसमे कम नही होगा ऐसा, ८० से कम नही होगा...आपको मै बोला भी था मै उस दिन” असे बोलले. त्यानंतर मी व पंच क्र.१ गवळी असे पुन्हा रिक्षाने जनकल्याणनगर, चारकोप, मालाड(प.) येथे शासकीय वाहनाजवळ दुपारी ०२.२२ वा. परत आलो.

त्यानंतर पोनि बनगोसावी यांनी माझे बनियनला लावलेला व्हाईस रेकॉर्डर काढून बंद करुन मी व पोलीस गणेश साळुंके यांच्यात झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यामधील संभाषण ऐकले. पोलीस गणेश साळुंके यांनी पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट निष्पन्न झाल्याने त्वरीत सापळा कारवाई करावयाची आहे असे पो.नि. बनगोसावी यांनी सागुन, त्याप्रमाणे मला, दोन पंच व सापळा कारवााईतील पोलीस पथक यांना सापळापुर्व/सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या.

तसेच मी दि. ०८/०३/२०२१ रोजी दिलेल्या तक्रार अर्जात नमुद केलेला इसम झाकीर डॉट कॉम याचे पडताळणीबाबत पो.नि. बनगोसावी यांनी माझेकडे विचारणा केली असता मी त्याना सांगितले की, झाकीर डॉट कॉम हा माझेशी फोनवर बोलणार नाही तसेच मी त्याचे ऑफिसवर भेट घेण्यासाठी गेल्यास तो मला भेट न देता हाकलून देईल असे सांगितले.

त्यानंतर पोलीस गणेश साळुंके यांनी माझ्याकडे मागणी केलेली लाचेची रक्कम रु. १ लाख माझ्याकडे नसल्याने, मी माझ्याकडील स्वतःचे बचतीतील रु. चार हजार ( रु. २०००/– किमतीच्या भारतीय चलनाच्या दोन नोटा एकुण रु. ४०००/– ) पो.नि. बनगोसावी यांचेकडे दिल्या. पो.नि. बनगोसावी यांनी त्यांचेकडे रू. २०००/– दराच्या खेळण्यातील बनावट नोटा रु. ९६,०००/– (एकुण ४८ टॉय नोटा) असल्याचे सांगुन ते लाचेकरीता वापरण्यात येणार असल्याचे सांगितले. पो.नि बनगोसावी यांनी पोलीस गणेश साळुंके यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझा डावा हात चेहऱ्यावरुन वारंवार फिरवून पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे आजुबाजुस थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

समक्ष

(signature) 10.3.21

**(प्रविण बनगोसावी)**
**पोलीस निरीक्षक,**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई**

मो० तहसीन
10-3-2021

Scanned with CamScanner

त्यानंतर पो.नि. बनगोसावी यांचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील पोलीस अंमलदार वाहन चालक पो.ना. चा.क्र. ९७०८६८/श्री. भोसले यांनी पोलीस वाहनात पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अ‍ॅथ्रासीन पावडर लावली व माझे पायजमाचे उजव्या बाजुस असलेल्या खिशात अलगद ठेवली व ते सापळा कारवाईत सहभाग घेणार नसल्याचे सांगितले. त्यांनतर मी दोन पंच व सापळा पथकातील पो. अधिकारी व कर्मचारी असे अ‍ॅटो रिक्षाने मी रहात असलेल्या वरील नमुद ठिकाणी आलो. सदर ठिकाणी पोहचल्यानंतर पो.नि. बनगोसावी, मी व पंच क्र. १ गवळी असे माझ्या घरामध्ये आलो. त्यानंतर पोलीस गणेश साळुंके यास माझे मोबाईलवरुन त्यांचे मोबाईलवर फोन करुन ते त्या परीसरात असल्याची खात्री करुन त्यांना लाचेची रक्कम माझ्याकडे तयार असल्याचे सांगण्याकरीता मी माझे मोबाईल फोनचा स्पीकर ऑन करुन गणेश साळुंके यांना फोन करुन, 'हो गया काम आ जाओ घरपे' असे बोललो असता गणेश साळुंके याने 'ठिक है, ठिक है आता हूँ' असे बोलला सदरचा कॉल पो.नि.बनगोसावी यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन रेकॉर्ड केला.

त्यानंतर स.पो.आ. आबासाहेब पाटील व पो.नि. बनगोसावी यांनी सापळा पथकातील कर्मचारी व पंच यांना माझे घराचे आजुबाजुला कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने थांवण्याच्या सुचना दिल्या. थोडयावेळात पोलीस गणेश साळुंके हे माझे घरासमोर आले त्यावेळी मी त्यांना 'हमारे तरफसे हो गया ये लो साब, गिन लो पुरा है I असे बोलून माझ्याकडील एक लाख रुपये लाचेची रक्कम ( रु. २०००/– किमतीच्या भारतीय चलनाच्या दोन नोटा एकुण रु. ४०००/– व रु. ९६,०००/– खेळण्यातील बनावट एकुण ४८ टॉय नोटा ) पोलीस गणेश साळुंके यांना दिली. ती त्यांनी त्यांचे डाव्या हाताने स्विकारुन त्यांनी परीधान केलेल्या पॅन्टचे डाव्या पुढील खिशात ठेवली. व तेथुन निघुन गेले. त्यांनतर मी देखील त्यांचे पाठोपाठ घराचे बाहेर रस्त्यावर येवून पोलीस गणेश साळुंके यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत चेहऱ्यावरुन वारंवार हात फिरवून सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीसांनी तात्काळ पोलीस गणेश साळुंके यास लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडुन ताब्यात घेतले.

पोलीस गणेश साळुंके यांनी माझेकडे " तुम्ही ८० रुम अवैध बांधल्या आहेत तुमचे व तुमच्या सर्व मुलांचे नांव पोलीस ठाण्यात आले असुन तुम्हाला एम.पी.डी.ए. लुवन तुम्हा सर्वाना एका वर्षासाठी जेलमध्ये जावे लागेल व जेलमध्ये जायचे नसल्यास त्याबाबत आम्हाला १० लाख रुपये दयावे लागतील" असे सांगितले.म्हणुन मी व माझ्या मुलांवर कारवाई होवू नये या भितीपोटी यापुर्वी ३ लाख रुपये पोलीस गणेश साळुंके यास दिले. तसेच उर्वरीत रक्कम रु. एक लाख लाचेची मागणी करुन ती माझे कडुन स्विकारली म्हणुन माझी त्याचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे, पोलीस गणेश साळुंके यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मला वाचुन दाखवुन हिंदीत समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

10.3.21

( प्रविण बनगोसावी ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

मो० तेहसीन
10-3-2021

Scanned with CamScanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ ........

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page

........ — ........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ — ........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........ — ........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page

यातील नमूद ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी ठाणेदार सुभाषराव सांळुके पो.नि. ०५०२८५ मालवणी पोलीस ठाणे, मुंबई यांनी फिर्यादी यांना बोलावून "तुम्ही १० रूम अवैध बांधल्या आहेत तुमचे व तुमच्या मुलाचे पोलीस ठाण्यात नाव आले असून तुम्हाला [illegible] लागेल" असे सांगून त्याबदल्यात फिर्यादी यांना १०,००,०००/- रुपयांची लाचेची मागणी करून तडजोडीअंती ५,००,०००/- रुपये लाच स्विकारण्याचे कबुल करून, यापूर्वी रु ३,००,०००/- स्विकारले उर्वरित रक्कम रुपये २,००,०००/ कायदेशीर परिश्रमाव्यतिरिक्त पारितोषण म्हणून स्विकारली, म्हणून कलम ७ भ्र.प्र.अधि १९८८ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

प्रविण पांडुरंग बनगोसावी, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

........ — ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ — ........, जिल्हा ........ — ........, राज्य ........ — ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)....—.... Rank....—.... No....—....
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........—........ (3) Transferred to P. S. ........—........

District........—........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.) मोठे इस्लाम

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant

बनगोसावी 10.3.21

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name प्रविण पांडुरंग बनगोसावी
पदनाम Rank........ पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ........ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
Posting मुंबई
Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख....................
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner